**महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय कार्यालयांकडून ई-ऑफिस प्रणाली अंमलबजावणी करणे व टपाल ई-ऑफिस प्रणालीद्वारे स्विकारण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण २०२६/ प्र.क्र./प्रशा-०१.**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ एप्रिल, २०२६

**वाचा -** सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०२/१८ (र. व का.), दि.०२ फेब्रुवारी, २०२३.

**परिपत्रक**

मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागासह क्षेत्रीय कार्यालयातील शासकीय कामकाजात ई-ऑफीस प्रणालीचा वापर करण्याच्या सूचना संदर्भीय परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यास अनुसरुन शासन स्तरावरील कामकाज पुर्णत: ई-ऑफीस प्रणालीवरुन सुरु झाले आहे. मात्र क्षेत्रीय यंत्रणांकडून अद्यापही हस्तबटवडा तसेच ई-मेल द्वारे टपाल पाठविण्यात येत आहे. यामुळे "**विकसित महाराष्ट्र-२०४७**" चे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी **गतिमान, पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन** या भुमिकांमधुन ई-ऑफीस प्रणालीच्या अनिवार्य उपयोगाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१) महसूल व वन विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी महसुली विभागनिहाय सर्व पत्रव्यवहार तसेच कार्यालयीन नस्त्यांचे / प्रस्तावांचे सादरीकरण हे ई-ऑफीसच्या माध्यमातून खालील नमुद तक्त्यातील मधील कर्मचाऱ्यांकडे अग्रेषित करावे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव | ई ऑफीस आय.डी. | महसुल विभाग |
|---|---|---|---|
| १ | Nitin Brijulal Mude | MRF-ADDIASO (NBM)-MRF(DESK REGISTRY) | **पुणे विभाग**-श्री.अजित देशमुख,सह सचिव<br>**कोकण विभाग**-श्री.संजय धारुरकर,उप सचिव व श्रीमती मनिषा जायभाये,सह सचिव<br>**धोरणात्मक व कायदेविषयक बाबी**-श्री.संजय धारुरकर, उप सचिव |
| २ | Rahulsinha Sawant | MRF-CLKTYP (RSS)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | **अमरावती विभाग**-श्री.ज्ञा.ल.सुळ,सह सचिव<br>**नागपुर विभाग**-श्रीमती आश्विनी यमगर,उप सचिव. |
| ३ | Sneha Dnyaneshwar Rathod | MRF-CLKTYP (SDR)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | **नाशिक विभाग**- श्री.संजय बनकर, सह सचिव<br>**छत्रपती संभाजीनगर**-श्री.कैलास गायकवाड, सह सचिव. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | Shweta Ganesh Thite | MRF-ST (SGT)-DESK REGISTRY MRF (DESKREGISTRY) | **न्यायालयीन संदर्भ /प्रकरणे, मंत्रालय नियंत्रण कक्ष संबंधित टपाल,** माहितीचा अधिकार व लोक आयुक्त संदर्भ.<br>भुमि अभिलेख संबंधी टपाल व नस्त्या-श्रीमती आश्विनी यमगर, उप सचिव |
| ५ | Shivaji Ramchandra Avhad | MRF-CLKTYP (SRA)-DESKREGISTRY-MRF(DESK REGISTRY) | **भुमापन व जमाबंदी आयुक्त यांचेकडील संदर्भ/नस्त्या**<br>श्री.संजय बनकर, सह सचिव<br>**नोंदणी व मुद्रांक विभाग, शेती महामंडळ**-श्री.सत्यनारायण बजाज,सह सचिव |
| ६ | Lav Ramkrishna Gavade | MANTRA-CRU-ASO (LRG)- MANTRA-CRU | **मध्यवर्ती टपाल केंद्रात सर्वसामान्य जनतेकडून येणारे टपाल.**<br>श्री.राजेश बागडे, उप सचिव |

२) वर नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी महसुली विभागांतर्गत असलेल्या जिल्हानिहाय संदर्भ हे ई-ऑफीस प्रणालीच्या Receipts द्वारे संबंधित कार्यासनातील कार्यासन अधिकारी व पर्यवेक्षीय अधिकारी यांच्याकडे ई-ऑफिस प्रणालीवरुन तात्काळ पाठविण्यात यावे.

३) संबंधित कार्यासनाचे कार्यासन अधिकारी/पर्यवेक्षीय अधिकारी यांची बदली झाल्यास नवीन येणाऱ्या कार्यासन अधिकारी/पर्यवेक्षीय अधिकारी यांची माहिती संबंधित कार्यासनाकडुन क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येईल.

४) उपरोक्त उपाययोजनांच्या अनुषंगाने दि.०१ एप्रिल, २०२६ नंतर कोणतेही हस्तबटवड्याचे टपाल शासनस्तरावर स्विकारण्यात येणार नाही, तसेच ई-मेलवरील संदर्भ शासकीय टपाल म्हणून गृहीत धरले जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी उचित नोंद घ्यावी.

५) उपरोक्त उपाययोजनांच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांमध्ये ई-ऑफीस प्रणालीच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक असलेल्या साधन सामुग्रीच्या (उदा. स्कॅनर, संगणक, डिजिटल सिग्नेचर करिता टोकन, इत्यादी) उपलब्धतेबाबतच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात.

६) ई-ऑफीस प्रणाली वापराच्या अनुषंगाने अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षणाची आवश्यकता असल्यास स्थानिक स्तरावरील महाआयटी/एनआयसी कार्यालयांकडून प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन करण्यात यावे अथवा क्षेत्रिय कार्यालयांच्या स्तरावर उपलब्ध असलेल्या महाआयटी / एनआयसी कडून आयटी मदतनीसांची मदत घेण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४१५१६२५४४९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

DNYANADEV LAXMAN SUL

Digitally signed by DNYANADEV LAXMAN SUL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=DNYANADEV LAXMAN SUL
Date: 2026.04.15 16:27:21 +05'30'

**( ज्ञा. ल. सुळ )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत-

- अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- अप्पर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

- प्रधान सचिव (मदत व पुर्नवसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रधान सचिव (अ. व रि. ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- संचालक,(आपत्ती व्यवस्थापक) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
- प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
- व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, एपीजे हाऊस, मुंबई.
- राज्य सूचना अधिकारी, राज्य सूचना विज्ञान केंद्र, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
- संचालक, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
- सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
- आयुक्त, जमाबंदी कार्यालय, पुणे
- संचालक, भुमी अभिलेख पुणे.
- महानिरिक्षक मुद्रांक, पुणे
- सर्व जिल्हाधिकारी कार्यालये
- सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग, मुंबई.
- निवडनस्ती (प्रशा-०१ शाखा) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.